संक्षिप्त फौ. प्र.क्र. १०/२०१९
सरकार वि. रसुल
नि.क्र

**सरकारतर्फे साक्षीदार क्र. ०३ शपथेवरः–**

माझे नाव – गजानन दत्ता येडले,
वय ३९ वर्षे, कामधंदा –सहायक वाहतुक, अधिक्षक, पाथरी,
रा. पाथरी बस डेपो. पाथरी.

**सरतपास विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस.एस. वाघमारे मार्फत शपथेवर सुरु :–**

**१.** दि. १५.०९.२०१६ ते २१.०४.२०२१ या कालावधीमध्ये मी औसा बस डेपो या ठिकाणी वाहतुक निरीक्षक या पदावर कार्यरत होतो. दि. ३१.१२.२०१८ रोजी लातुर – निलंग बस क्र. एम. एच. १४ बी.टी. १९५९ ही निलंगयाकडे जात असताना वाघोली पाटीच्या पुढे पाठीमागुन येणा–या, डमपर चालकाने ाडक दिल्याचे बस चालक गोबाडे यांनी मला सांगितले. त्यावेळी मी आणि सहकारी लिपीक गिरी घटनासस्थळाकडे रवाना झालो. घ ाटनास्थळी पाहिले की, डंम्परने पाठीमागुन रा. प. च्या बसला पाठीमागुन ाडक दिल्यामुळे पाठीमागील बम्पर व पत्रा आत दबल्याचे दिसुन आले. सदर अपघातामध्ये बसचे अंदाजे रूपये पंचवीस हजारचे नुकसान झाले होते. त्यावेळी महामडळांच्या नियमाप्रमाणे बसचा पंचनामा केला आणि त्यानंतर बस चालकाने अपघाताची माहीती किल्लारी पोलीस स्टेशनला दिली. अपघ ाताच्या माहीती दिल्यानंतर किल्लारी पोलीस स्टेशनचे कर्मचारी चपटे यांनी अपघातास्थळाची पाहणी केली आणि बस चालकास तक्रार देण्यास सांगितले. त्याअनुंषगाने किल्लारी पोलीस ठाण्यात बसचालकाने डंम्पर चालकाविरूद तक्रार दाखल केली. सदरची बस लातुर–निलंगा विना वाहक विना थांबा चाललेली होती. त्यावेळी सदर बसमध्ये ३८ प्रवाशी होते. प्रवाशांना अपघ ातामध्ये कोठेही दुखापत झालेली नाही. सदरचा डमपर देखील लातुरहुन निलंग्याकडे निघालेला होता. डमपर चालकाने दोन्ही वाहनामध्ये सुरक्षीत

अंतर न ठेवल्यामुळे दोन्ही वाहनाचा अपघात झाला व बसचे नुकसान झाले. डंम्पर चालकाच्या निष्काळाजीपणमुळे सदरचा अपघात झाला. सदर डंम्परचा क्र. एम. एच. २४- ए.यु. १७८५ असा होता. सदरचा डंम्पर रसुल सत्तार पठाण चालवत होता. पोलीसांनी मला आरोपी दाखवलेला होता. परंतु मी त्याला सध्या ओळखत नाही. सदर आरोपीचा फोटो दाखवल्यास मी आरोपीस ओळखु शकतो. आता मला आरोपीचा अटक पंचनाम्यावरील फोटो दाखवण्यात आला. सदरचा फोटो डंम्पर चालक आरोपीचाच आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आय. एच. पटेल यांच्या मार्फत साक्षीदाराचा उलटतपास सुरू -**

२. दि. ३१.१२.२०१८ रोजी अपघातातील बस लातुर ते निलंगा चाललेली होती याबाबतची कागदपत्रे मी पाहिलेली आहेत. हे म्हणणे खरे नाही की, अपघातातील बस घटनेच्या वेळी लातुर ते निलंगा या मार्गाने जात होती आणि सदर बसचे चालक गोबाडे होते मी कागदपत्राच्या अनुषंगाने सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी अपघ ाातातील बस चालक यांची मी सदर बसवर नियुक्ती केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील बस लातुर ते निलंगा या मार्गेने नेण्याचे मी आदेशीत केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळावरील वाघ ाोली पाटी या ठिकाणी चढ आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघातस्थळ चढ असल्यामुळे अवजड वाहनाना कमी वेगाने जावे लागते. मी केलेला घ टनास्थळावरील बस पंचनामा तपासी अधिकारी यांना दिलेला नाही. मी घ टनास्थळी गेलो त्यावेळी बसचालक गोबाडे, एक प्रवासी, मी व गिरी एवढेच लोक त्या ठिकाणी हजर होतो. हे म्हणणे खरे आहे की, बसच्या प्रवासदरम्यान नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी वाहन चालकावर असते. घटना घडली त्यावेळी मी बस डेपोमध्ये होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटना मी प्रत्यक्ष पाहिलेली नसल्यामुळे ती कोणच्या चुकीमुळ घडली हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात डंम्पर चालकाच्या चुकीमुळे झाला हे मी बसचालक गोबाडे यांच्या सांगण्यावरून

सांगत आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, डंम्पर चालकाचे नाव आणि डंम्पचरचा क्रमांक आज मला फाईल वाचल्यानंतर समजला. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझी पुर्वीची ओळख नाही. दि. ०१.०१.२०१९ रोजी अपघताच्या अनुषंगाने पोलीसांनी माझा जबाब नोंदवला होता. सदरचा जबाब नोंदवतेवेळी मला पोलीसांनी मला आरोपी दाखवला आणि मी आरोपी पाहिला हा मजकुर सांगितला होता. वर नमुद मजकुर माझया जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, पोलीसांनी आरोपी मला घटनास्थळी दाखवला होता.

४. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब नोंदवतेवेळी अपघ ाातातील डंम्पर लातुरहुन निलंग्याकडे निघालेला होत हा मजकुर सांगितला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझा जबाब नोंदवतेळी डंम्पर चालकाने सुरक्षीत अंतर न ठेवल्यामुळे सदरचा अपघात झाला हा मजकुर पोलीसांनी सांगितला होता वर नमुद मजकुर माझया जबाबात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात बस चालकाच्या चुकीने झालेला आहे.

५. अपघातानंतर मी महामंडळाच्या नियमानुसार बसचा पंचनामा केला हा मजकुर तपासी अधिकारी यांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि ३१.१२.२०१८ रोजी लातुर - निलंग बस क्र. एम. एच. १४ बी.टी. १९५९ ही निलंग्याकडे जात असताना वाघोली पाटीच्या पुढे पाठीमागुन येणा-या, डंम्पर चालकाने ाडक दिल्याचे बस चालक गोबाडे यांनी मला सांगितले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात डंम्पर क्र. एम.एच. २४-ए.यु. १७८५ च्या चालक रसुल पठाण याच्या चुकीमुळे झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताच्या वेळी डमपर आरोपी चालवत होता हे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत करण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

सा.वा.दा.अ.ब.अ.कबूल केले.

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.04.02 11:09:21 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि.०१.०४.२०२६

माझे समक्ष,

Digitally signed by NALAWADE SHUBHANGI HEMANT
Date: 2026.04.02 11:09:14 +0530

(एस. एच. नलावडे)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
औसा
दि. ०१.०४.२०२६